नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - १२६ | Issue - 126 | वार रविवार दि. २२ सप्टेंबर २०२४ | Blow- Sunday Date 22 September 2024 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोडक्यात

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्काराने होणार सन्मान

मुंबई : मारवाडी म्हणून ओळखल्या जाणा-या समाजाने केवळ भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात कार्यकर्तुत्वाचा ठसा उमटविला आहे. ही गौरवगाथा सर्वसमावेशक, अधिकाधिक व्यापक, चैतन्यदायी व सामाजिक बांधीलकीच्या मार्गाने प्रेरणादायी बनविण्याचा प्रयत्न म्हणून महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्याप्रती आदर व्यक्त करण्यासाठी त्यांच्या नावाने राष्ट्रीय पातळीवर विविध क्षेत्रात आपल्या अलौकिक कार्याचा ठसा उमटविणा-या व्यक्तीला तसेच त्यांच्या विचारांनी प्रेरित होऊन कार्य करणा-या मान्यवराला दरवर्षी मारवाडी फाऊंडेशनच्या वतीने ५ लाख रुपये रोख, शाल, श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन त्याचा गौरव करीत असतो. यंदा सन २०२४ चा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांना देऊन गौरविण्यात येणार आहे. हा पुरस्कार सोहळा रविवार २२ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ११ वाजता बॅनियन हॉल, चिटणवीस सेंटर सिव्हील लाईन्स, नागपुर येथे आयोजित करण्यात आला आहे. केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या शुभहस्ते व माजी खासदार प्रदिप गांधी यांच्या अध्यक्षतेखाली पुरस्कार प्रदान करण्यात येईल. सभारंभाला नागरिकांनी मोठया संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन मारवाडी फाउंडेशनच्या वतीने करण्यात आले आहे.

### निर्घृण हत्या; फ्रीजमध्ये आढळले महिलेच्या शरीराचे २० तुकडे

दिल्ली : दिल्लीत घडलेल्या श्रद्धा वालकर हत्याकांडासारखीच घटना बंगळुरूमध्ये घडली आहे. एका महिलेची निर्घृण हत्या करून तिच्या मृतदेहाचे २० तुकडे फ्रिजमध्ये ठेवण्यात आले होते. बंगळुरूच्या व्यालिकवल परिसरात शनिवारी (दि. २१ सप्टेंबर) ही घटना उघडकीस आली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २९ वर्षीय महालक्ष्मी नावाची तरुणीचा खून झाला आहे. तिच्या पतीचे नाव हेमंत दास आहे. पण गेल्या काही दिवसांपासून ती एकटीच राहत होती. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर खून १५ दिवसांपूर्वीच झाला असून महालक्ष्मीच्या शरीराचे तुकडे करून १६५ लीटरच्या फ्रिजमध्ये ठेवण्यात आले. शेजाऱ्यांना दुर्गंधी येऊ लागल्यानंतर त्यांनी याची माहिती महालक्ष्मीच्या नातेवाईकांना दिली. त्यांनी येऊन पाहिल्यानंतर सदर प्रकार उजेडात आला. व्यालिकवल पोलीस आता या घटनेचा तपास करत आहेत.

## हिंसक वक्तव्य करणाऱ्यांना अटक करा

मुंबई : राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळली असून राज्यात राजकीय व सामाजिक अस्थिरता निर्माण झाली आहे. विदर्भ आणि मराठवाड्यातील अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना अद्याप मदत मिळाली नाही. यामुळे जनतेमध्ये, शेतकरी वर्गात प्रचंड प्रमाणात अस्वस्थता आहे. या सर्व प्रश्नांवर काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने आज राज्यपालांची भेट घेऊन निवेदन दिले. निवेदनात काय म्हणाले, सत्ताधारी पक्षाच्या नेत्यांकडून सातत्याने महाराष्ट्राच्या समृद्ध राजकीय परंपरेला काळीला फासला जात आहे. आमदार संजय गायकवाड यांनी राहुल गांधी यांची जीभ कापणाऱ्यास बक्षीस देण्याची तर खासदार अनिल बोंडे यांनी राहुल गांधी यांच्या जिभेला



**राज्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्णपणे बिघडली आहे. विधानसभा निवडणूक निर्भय वातावरणात होईल याबाबत शंका आहे. राज्यात महिलांवरील अत्याचारात मोठयाप्रमाणात वाढ झाली असून अल्पवयीन, शाळकरी मुलींवरील अत्याचाराच्या बदलापूर व नागपूर येथे घडलेल्या गुन्ह्यात आरोपींना पाठीशी घालण्याचे काम सरकारकडून केले जात आहे. स्पर्धा परीक्षा रखडल्या आहेत. उमेदवारांना सरकारकडून नियुक्त्या देण्यात आलेल्या नाहीत. युवा पिढी बेरोजगारीमुळे नैराश्याच्या गर्तेत जात आहे. ही परिस्थिती सुधारण्यासाठी आपण सरकारला निर्देश द्यावेत, अशी राज्यातील जनतेची आपणाकडून अपेक्षा आहे, असे काँग्रेस पक्षाच्या शिष्टमंडळाने राज्यपालांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी या संपूर्ण प्रकरणात लक्ष घालणार असल्याचे आश्वासन काँग्रेस शिष्टमंडळाला दिले आहे. त्याचबरोबर वादग्रस्त विधानबाबत गृह खात्याकडून माहिती घेऊन कडक कारवाई करण्याचे आश्वासनही राज्यपाल यांनी दिले.**

### काँग्रेस शिष्टमंडळाचे राज्यपालांना निवेदन

चटके देण्याची विधाने केली आहेत. लोकशाहीत विरोधकांवर टीका करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, पण विरोध करताना जीवाला धोका निर्माण करणे, हिंसेला प्रवृत्त करण्याची भाषा लोकप्रतिनिधींनी वापरणे हे कायद्याला धरून नाही.

या प्रकरणात मुख्यमंत्री, गृहमंत्र्यांनी आणि पोलिसांनी खेदाने बघ्याची भूमिका घेतली. गुन्हा दाखल करण्यासाठी देखील काँग्रेस नेत्यांना आंदोलन करावी लागली त्यानंतर गुन्हे दाखल झाले, पण आमदार संजय गायकवाड आणि खासदार अनिल बोंडे यांना अजूनही अटक करण्यात आलेली नाही. प्रक्षोभक विधाने करून धार्मिक तेढ निर्माण करण्याचा प्रयत्न करणा-या आमदारांवर पोलिस कारवाई करत नाही याचा अर्थ राज्यात दंगली घडवण्याचा सत्ताधारी पक्षांचा कट आहे का?

मराठवाड्यात अतिवृष्टी झाली, शेतकऱ्याचे सहा लाख हेक्टर वरील पिकांचे नुकसान झाले. अजूनही याचे पंचनामे झालेले नाहीत. केंद्रीय कृषी मंत्री यांनी आंध्र प्रदेश आणि तेलंगणा राज्याचा दौरे करून मदत जाहीर केली पण महाराष्ट्रात मात्र अजूनही केंद्रीय कृषी मंत्री किंवा केंद्रीय पथक पाहणी करण्यास आले नाही. महाराष्ट्रातील शेतकऱ्यांबाबत (पान २ वर...)

## मुख्यमंत्रिपदी आतिशी विराजमान! दिल्लीच्या सर्वात तरुण मुख्यमंत्री

नवी दिल्ली : आतिशी मार्लेना यांनी आज दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे. आम आदमी पक्षाचे प्रमुख नेते आणि दिल्लीचे माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी १७ सप्टेंबरला त्यांच्या मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर आतिशी यांची एकमताने निवड मुख्यमंत्री म्हणून करण्यात आली. २१ सप्टेंबर शनिवार या दिवशी आतिशी यांना उपराज्यपालांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ दिली. आतिशी या आपच्या आमदार आहेत. अरविंद केजरीवाल आणि मनिष सिसोदिया यांच्या निकटवर्तीय मानल्या जातात.

दिल्लीच्या मुख्यमंत्री म्हणून आतिशी यांनी शपथ घेतली. त्यांच्यासह पाच आमदारांनाही मंत्रिपदाची शपथ देण्यात आली. उपराज्यपालांच्या निवासस्थानी हा सोहळा पार पडला. आतिशी या दिल्लीच्या सर्वात तरुण मुख्यमंत्री ठरल्या आहेत. त्यांच्या



शपथविधी सोहळ्याला अरविंद केजरीवाल यांच्यासह इतर प्रमुख नेते उपस्थित होते. १५ सप्टेंबर रोजी अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा देणार हे जाहीर केलं होतं. त्यानंतर आम आदमी पक्षाच्या मुख्यमंत्रिपदी कोण विराजमान होणार याची चर्चा रंगली होती. पुढच्या दोन दिवसातच आतिशी यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं. आता आतिशी यांनी मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली आहे.

आतिशी यांचा जन्म दिल्लीतील एका उच्चशिक्षित कुटुंबात झाला. त्यांचं कॉलेजपर्यंतचे शिक्षण दिल्लीतूनच झालं आहे पुढे त्या उच्च (पान २ वर..)

## महाराष्ट्र देशाच्या तर एमएमआर महाराष्ट्राच्या प्रगतीचे इंजिन : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

ठाणे : देशाचे पॉवर हाऊस होऊ शकेल इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे. महाराष्ट्र हे देशाच्या प्रगतीचे इंजिन आहे, तर आपलं ठाणं विकासाचं खणखणीत नाणं असल्याचे उद्गार मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काढले.

डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे आयोजित 'मुंबई महानगर प्रदेश अंतर्गत' 'ठाणे विकास परिषद-२०२४' कार्यक्रमात ते बोलत होते.



यावेळी राज्य उत्पादन शुल्क तथा ठाण्याचे पालकमंत्री शंभूराज देसाई, नियोजन मंडळाचे उपाध्यक्ष राजेश क्षीरसागर, खासदार नरेश म्हस्के, आमदार प्रताप सरनाईक, माजी आमदार रवींद्र फाटक, 'मित्रा' चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचे प्रधान सचिव प्रवीण दराडे, म्हाडाचे मुख्य कार्यकारी अधिकारी संजीव जयस्वाल, मुंबई झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर, जिल्हाधिकारी अशोक शिनगारे, ठाणे महानगरपालिकेचे आयुक्त सौरभ राव, 'मित्रा' चे सह मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील खोडवेकर व अमन मित्तल, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण महामंडळाचे सदस्य सचिव अविनाश ढाकणे, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, पर्यटन विभागाचे संचालक बी. एन. पाटील, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे, उद्योग विकास आयुक्त दीपेंद्रसिंह कुशवाह, अतिरिक्त विकास आयुक्त प्रदीप चंद्रन, एमएमआरडीचे विक्रमकुमार, कल्याण डोंबिवली महानगरपालिका आयुक्त इंदूराणी जाखड, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, ठाणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाचे सह मुख्य (पान २ वर...)

## भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी देशातील २० नद्या एकमेकांशी जोडणार : केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील

जलयुक्त शिवार योजना यशस्वी करण्यामध्ये 'नाम' फाउंडेशनचा मोठा वाटा : उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुणे : प्रत्येक घरात पाणी पोहोचवण्यासाठी केंद्र सरकार 'हर घर जल' योजना राबवित आहे. पाण्याची कमतरता दूर करण्यासाठी शासन प्रयत्नशील असून पडणाऱ्या पावसाचा प्रत्येक थेंब जमीनीत मुरवणे आवश्यक



आहे. भविष्यातील पाण्याची कमतरता टाळण्यासाठी पाण्याचा पुनर्वापर करावा. देशातील लोकसंख्या, पशुधन, शेती यांना पाण्याची पुरेशी उपलब्धता असावी, यासाठी पुढील दोन महिन्यात देशातील २० नद्या एकमेकांशी जोडण्यात येणार, असे प्रतिपादन केंद्रीय जलसंसाधन मंत्री सी. आर. पाटील यांनी केले.

गणेश कला क्रीडा मंच येथे नाम फाउंडेशनच्या ९ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उद्योगमंत्री उदय सामंत, सुरतच्या आमदार संगीता पाटील, नाम फाउंडेशनचे अध्यक्ष नाना पाटेकर, संस्थापक मकरंद अनासपुरे उपस्थित होते.

केंद्रीय मंत्री श्री. पाटील म्हणाले की, 'हर घर जल' योजनेमुळे महिलांची पाण्यासाठीची भटकंती थांबली. देशातील महिलांचे दररोजचे साडेपाच कोटी तास (पान २ वर...)

## एअर मार्शल अमर प्रीत यांची एअर चीफ मार्शलच्या प्रमुखपदी नियुक्ती

नवी दिल्ली : पाच हजार तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव असलेले एअर मार्शल अमर प्रीत सिंग हे एअर चीफ मार्शल विवेक राम चौधरी यांच्यानंतर भारतीय हवाई दलाचे पुढील प्रमुख असतील. सिंग सध्या हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून कार्यरत आहेत, ते ३० सप्टेंबर रोजी दुपारी दलाचा पदभार स्वीकारतील, असे संरक्षण मंत्रालयाने सांगितले.

सरकारने एअर मार्शल अमर प्रीत सिंग, पीव्हीएसएम, एव्हीएसएम, जे सध्या हवाई दलाचे उपप्रमुख म्हणून कार्यरत आहेत, ३० सप्टेंबरच्या दुपारपासून एअर चीफ मार्शल पदावर पुढील हवाई दल प्रमुख म्हणून नियुक्त केले आहेत, असं मंत्रालयाने म्हटलं आहे.

एअर चीफ मार्शल चौधरी ३० सप्टेंबर रोजी सेवेतून निवृत्त होणार आहेत. २७ ऑक्टोबर १९६४ रोजी जन्मलेले एअर मार्शल सिंग यांना डिसेंबर १९८४ मध्ये भारतीय हवाई दलाच्या फायटर पायलट स्ट्रीममध्ये नियुक्त करण्यात आले. सुमारे ४० वर्षांच्या प्रदीर्घ आणि प्रतिष्ठित सेवेदरम्यान, त्यांनी विविध कमांड, कर्मचारी, निर्देशात्मक आणि परदेशी नियुक्तींमध्ये काम केले आहे.



अमर प्रीतसिंग हे नॅशनल डिफेन्स अकादमी, डिफेन्स सर्व्हिसेस स्टाफ कॉलेज आणि नॅशनल डिफेन्स कॉलेजचे माजी विद्यार्थी असून एक पात्र फ्लाइंग इंस्ट्रक्टर आणि एक प्रायोगिक चाचणी पायलट आहेत. त्यांना विविध प्रकारच्या स्थिर आणि रोटरी-विंग विमानांवर पाच हजार तासांपेक्षा जास्त उड्डाणाचा अनुभव (पान २ वर...)

**बांधकाम कामगार मेळावा** — उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते सुरक्षाकवच कार्ड,संसार व सुरक्षा किटचे वाटप

## बांधकाम कामगारांना विविध योजनांच्या माध्यमातून सामाजिक सुरक्षा : उपमुख्यमंत्री फडणवीस

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : विविध कल्याणकारी योजनांच्या माध्यमातून सामान्य माणसाच्या जीवनात परिवर्तन घडविण्याच्या दृष्टीने राज्य शासन कार्य करीत आहे. बांधकाम कामगार मंडळाद्वारे राज्यातील ३८ लाखांवरील कामगारांची नोंदणी करून विविध योजनांच्या माध्यमातून त्यांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येत असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज बांधकाम कामगारांच्या मेळाव्यात केले. त्यांच्या हस्ते कामगारांना सुरक्षाकवच कार्ड, संसार व सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले.

येथील गोपालनगर परिसरातील नवनिर्माण गृह संकुलाच्या मैदानावर आयोजित 'बांधकाम कामगार मेळाव्यात' उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. बांधकाम कामगार मंडळाचे माजी अध्यक्ष ओमप्रकाश उर्फ मुन्ना यादव, माजी महापौर



संदीप जोशी, नगरसेविका सोनाली कडू आदी यावेळी मंचावर उपस्थित होते.


उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, बांधकाम कामगार मंडळाच्या माध्यमातून कामगारांची नोंदणी करून त्यांना विविध शासकीय योजनांद्वारे सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यात येत आहे. बांधकाम कामगारांच्या मुलांना पहिली ते पदवीपर्यंतचे शिक्षण मोफत देण्याची सोय करण्यात आली आहे. तसेच ज्या मुलांचा मानाच्या शैक्षणिक संस्थांमध्ये प्रवेश झाला त्यांना शिक्षण शुल्क माफ करण्यात आले आहे. या कामगारांच्या कुटुंबियांना ५ लाखांपर्यंतचे उपचार मोफत देण्यात येत आहे. बेघर कामगारांना 'अटल आवास योजना' आणि 'प्रधानमंत्री आवास योजने'च्या माध्यमातून ४ लाखांची आर्थिक मदत देऊन हक्काची घरे देण्यात आली. कौशल्य प्रशिक्षणाच्या माध्यमातून कामगारांच्या मुलांना कौशल्य आधारित शिक्षण देण्यात येत आहे.बांधकाम कामगारांना आज सुरक्षाकवच कार्ड देण्यात आले असून याद्वारे कामगारांच्या कुटुंबियांना आरोग्य,शिक्षण,घरकुल आदी १२ सेवा देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमात उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या हस्ते प्रातिनिधिक स्वरूपात कामगारांना सुरक्षाकवच कार्ड, संसार व सुरक्षा किटचे वाटप करण्यात आले.

राज्यशासनाने जनसामान्यांसाठी विविध कल्याणकारी योजना आणल्या आहेत. मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून महिलांच्या बँक खात्यात दर महिन्याला १५०० रुपयांची मदत देण्यात येते. 'लेक लाडकी योजने'च्या माध्यमातून मुलीच्या जन्मापासून ते १८ वर्षा पर्यंत टप्प्या टप्प्याने १ लाखा पर्यंतची मदत देण्यात येत आहे. मुलींना मोफत उच्च शिक्षणाची सोय करण्यात आली आहे. राज्यातील १ कोटी महिलांना लखपतीदीदी करण्याचा निर्धार राज्य शासनाने घेतला आहे. युवकांच्या हाताला काम देण्यासाठी 'कमवा आणि शिका' योजने प्रमाणे 'मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना' सुरू करण्यात आली असून या योजनेचा राज्यातील जास्तीत -जास्त युवकांनी लाभ घ्यावा, असेही श्री. फडणवीस म्हणाले.

## जरांगे पाटील यांच्या समर्थनार्थ धाराशिव बंदला प्रतिसाद

धाराशिव : ओबीसी प्रवर्गातूनच मराठा समाजाला आरक्षण देण्यात यावे, या मागणीसाठी सकल मराठा समाजाच्यावतीने शनिवारी धाराशिव जिल्हा बंदची हाक देण्यात आली होती. या बंदच्या माध्यमातून मनोज जरांगे पाटील यांच्या आंदोलनाला मराठा समाजबांधवांनी समर्थन दिले. दरम्यान या बंदला जिल्ह्यातील धाराशिवसह, परंडा, भूम, वाशी, कळंब, उमरगा, लोहारा, तुळजापूर शहरासह तालुक्यातील ग्रामीण भागातील व्यापारी, शाळा, महाविद्यालयांकडून चांगला प्रतिसाद मिळाला.



मनोज जरांगे पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण मिळावे, यासाठी अंतरवाली सराटी येथे अमरण उपोषण सुरू केले आहे. त्यांच्या उपोषणाला संपूर्ण मराठा समाजाचे समर्थन आहे. उपोषणाच्या समर्थनार्थ शनिवार जिल्हा बंद ठेवून मागणीचे निवेदन सकल मराठा समाज बांधवांच्या वतीने महसूल प्रशासनामार्फत देण्यात आले.

मराठा समाजाला ओबीसी वर्गातून आरक्षण मिळावे, यासाठी मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या वर्षभरापासून लढा सुरु केला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी अमरण उपोषण सुरू केले असून या उपोषणाला पाठिंबा देऊन मराठा समाजाच्या वतीने शनिवारी जिल्ह्याभरात पुकारण्यात आलेल्या बंदला मोठा प्रतिसाद मिळाला.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## कळंब तालुक्यामध्ये वीज पडून २१ वर्षीय तरूण ठार



कळंब/सुधाकर रणदिवे : कळंब तालुक्यातील भाटशिरपुरा गावांमध्ये शेतातील सोयाबीनची गंज झाकत असताना वीज पडून तरुण शेतकरी अजय आसाराम गायकवाड( वय वर्ष २१ ) यांचा जागीच मृत्यू झाल्याची घटना शनिवार दि. २१ रोजी चार वाजण्याच्या सुमारास घडली आहे.

अधिक माहिती अशी की कळंब तालुक्यातील भाट शिरपुरा गावामध्ये सायंकाळी चारच्या सुमारास वादळी पावसाला सुरुवात झाल्याने अचानक झालेल्या विजेच्या कडकडाट मध्ये आपल्या शेतातील सोयाबीनची गंज झाकत असताना येथील तरुण शेतकरी अजय आसाराम गायकवाड याचा मृत्यू झाला, या घटनेमुळे भाटशिरपूर गावात मोठ्या प्रमणात हळहळ व्यक्त होत आहे.

## शिवसुंदर तरुण मंडळातर्फे राहुल घाटगे दादा यांचा सत्कार



दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

टाकळीवाडी/नामदेव निर्मळे : टाकळीवाडी तालुका शिरोळ येथील श्री गुरुदत्त शुगर्स लिमिटेड टाकळीवाडी एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर राहुल घाटगे दादा यांची वेस्ट इंडियन शुगर मिल असोशीयेशन या संस्थेच्या संचालक पदी निवड झाल्याबद्दल शिवसुंदर तरुण मंडळ यांचे संस्थापक श्री लक्ष्मण निर्मळे व मंडळातील सर्व सभासदांच्या वतीने सत्कार करण्यात आला. सत्कार मूर्ती श्री राहुल दादा घाटगे यांना मंडळाच्या वतीने शाल श्रीफळ व सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.

## हिंसक वक्तव्य करणाऱ्यांना अटक करा

(पान १ वरून..) इतका दूजाभाव का ? या राज्यातील शेतकऱ्यांच्या व्यथा दिसत नाही का त्यांना मदत करण्याची केंद्र आणि राज्य सरकारची भूमिका नाही. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या नेतृत्वाखालील या शिष्टमंडळात काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, विधानसभा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, काँग्रेस कार्यसमितीचे सदस्य व प्रदेश कार्याध्यक्ष नसीम खान, चंद्रकांत हंडोरे, मुंबई काँग्रेस अध्यक्ष खा. वर्षाताई गायकवाड, माजी मंत्री डॉ. नितीन राऊत, खा. विशाल पाटील, माजी मंत्री अस्लम शेख, डॉ. विश्वजीत कदम, आ. भाई जगताप, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सचिव रविंद्र दळवी, आ. अमिन पटेल, आ. विक्रम सावंत, चरणसिंह सप्रा, सचिन सावंत उपस्थित होते.

## महाराष्ट्र देशाच्या तर एमएमआर महाराष्ट्राच्या प्रगतीचे इंजिन : मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

(पान १ वरून..) कार्यकारी अधिकारी अनिल भंडारी, मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त संजय काटकर, भिवंडी-निजामपूर महानगरपालिकेचे आयुक्त अजय वैद्य, वसई-विरार महानगरपालिका आयुक्त अनिल पवार, अप्पर जिल्हाधिकारी मनिषा जायभाये-धुळे, जिल्हा नियोजन अधिकारी वैभव कुलकर्णी, उद्योग सहसंचालक विजू शिरसाठ आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले की, आपण मुंबई महानगर प्रदेशात पाच सेक्टर्समध्ये जर धोरणात्मक काम केले तर आपली अर्थव्यवस्था १.५ ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याची क्षमता या मुंबई महानगर प्रदेशात आहे. यामुळे सर्वांना उद्योग, सर्वांना रोजगार, सर्वांना घरे, हरित ठाणे अशा सर्व गोष्टी साध्य करु शकतो. ठाण्यामध्ये काही गोष्टी सुरु होतात, मग नंतर त्या इतर सर्व ठिकाणी सुरु होतात, असा हा ठाण्याचा इतिहास आहे. महाराष्ट्र हे देशाचे पॉवर हाऊस होईल, इतकी ताकद महाराष्ट्रामध्ये आहे.

ते म्हणाले, शेतीनंतर रिअल इस्टेट जास्त रोजगार देणारे क्षेत्र आहे. महाराष्ट्र आता जीडीपी, परदेशी गुंतवणूक, पायाभूत सुविधांचे जाळे निर्माण करण्यात अशा विविध क्षेत्रात पहिल्या क्रमांकावर आहे. देशाच्या एकूण गुंतवणुकीपैकी ५२ टक्के ही एकट्या महाराष्ट्राची आहे. अटल सेतूमुळे आपण आता मुंबई ते नवी मुंबई हा प्रवास फक्त २० मिनिटात करू शकतो. या प्रकल्पाबाबत आधी फ्लेमिंगो पक्षी नाहीसे होतील अशी टीका करण्यात आली. मात्र, पर्यावरण विषयक काम करणाऱ्या संस्थांनी प्रत्यक्षात फ्लेमिंगोंची संख्या दुप्पट झाल्याचा अहवाल दिला आहे. अटल सेतू हा मार्ग एक गेम चेंजर प्रकल्प ठरला आहे. समृद्धी महामार्गामुळे ८ तासात आपल्याला नागपूरला पोहोचता येते. लवकरच ठाणे ते बोरिवली प्रवास आपण २० मिनिटात करू शकणार आहोत. ईस्टर्न फ्री वेचा विस्तार करण्यात येत आहे. विरार-अलिबाग कॉरिडोरचे काम सुरु होत आहे. असे विविध प्रकल्प साकारताना, विकासकामे करताना जास्तीत जास्त प्रमाणात आधुनिक तंत्रज्ञान वापरले जात आहे. नवी मुंबई विमानतळाचे काम लवकर पूर्ण होणार आहे. पालघरला तिसरे विमानतळ तयार करीत आहोत. आपल्याकडे उद्योगासाठी लागणाऱ्या सर्व गोष्टी असल्यामुळे उद्योग आपल्या राज्यात येत आहेत. दाओसला जाऊन १ लाख ३७ कोटींच्या करारांवर स्वाक्षरी केली आहे. त्यातील बहुतांश उद्योगांचे काम ही सुरु झाले आहे. ३ लाख ५० हजार कोटींच्या सामंजस्य करारांवर स्वाक्षरी करण्यात आल्या आहेत. नुकताच इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर चीप बनविण्याचाही प्रकल्प सुरु करण्यात आला आहे. लवकरच इलेक्ट्रॉनिक्स सेमिकंडक्टर चीप बनविण्याच्या प्रकल्पासाठी ८४ हजार कोटींचा करार होतोय. महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणावर पॉवर, स्टील, औषध निर्माण अशा विविध क्षेत्रातील उद्योग येत आहेत. मी सर्व अधिकाऱ्यांना सक्त सूचना दिल्या आहेत की, उद्योग क्षेत्रातील कोणतीही तक्रार येता कामा नये. माझ्याकडे तक्रार आलीच तर मी त्या तक्रारीचे तात्काळ निराकरण करतो. राज्यात जास्तीत जास्त उद्योग आले तर राज्याची प्रगतीही जास्तीत जास्त होईल, यावर माझा ठाम विश्वास आहे.

# समाज, धर्म आणि संस्कृती...!


दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क

जग अनित्य आहे. सतत बदलत आहे. जीवन गतिमान आहे. येथे बुद्धिप्रामाण्यवाद आहे. प्रत्यक्ष प्रमाण आहे. वास्तव जीवनाचे शिल्पकार आपणच आहोत. यागोष्टी स्पष्टपणे सांगायचे असते. ते सांगितले की माणसांचे खून होतात. त्यांना गोळ्या घालून संपविले जाते. मारेक-यांचे काय शौर्य आहे बघा. ज्यांना बोलता येत नाही. त्यांचे मौन आहे. साहित्य विचार आणि भाषाचे वाहक आहे. वास्तव काय आहे ? सत्य कशाला म्हणावे ? जग मिथ्या आहे सत्य याचे उत्तर साहित्याला शोधावे लागते. माणसाच्या जीवनाचे दर्शन घडविणारे, त्यांना माणुसकीने जगण्याची संधी देणारे, माणसाच्या मनातील करूणा जागृत करणारे साहित्याची भुमिका महत्वाची आहे. साहित्य हे देखील विज्ञानाप्रमाणे सत्याचा शोध घेणायचे साधन आहे. खरे म्हणजे, विज्ञानवाद, विवेकवाद आणि मानवतावाद या तीन मुल्ल्याद्वारे समाज निर्मिती होत असते. शेवटी माणसाला त्याच्या दु:खातून मुक्त करणे हे साहित्याचे प्रयोजन आहे. साहित्याची प्रमूख माध्यम म्हणजे पुस्तके व प्रकाशने आहेत. परंतु पुस्तके स्फोटक कशी असू शकतात ? एखाद्या न्यायाधिशाला सापडलेली पुस्तके स्फोटक वाटत असतील तर त्या देशाचा बुध्यांक नेमका काय आहे ? तो देश नेमका कोणत्या दिशेला प्रवास करत आहे. हे तपासावे लागेल. प्रवासाला निघालेल्या माणसाला आपण प्रवास का करित आहोत आणि आपण कुठे जाणार आहोत हे माहित असणे तितकेच महत्वाचे आहे.

तथापि, साने गुरूजीची 'आई', मॅक्झिम गॉर्कीची 'मदर', कार्ल मार्क्सच्या 'दास कॅपिटॉल' पुस्तकाने रशियात क्रांती घडवून आणली. कामगारांची पिळवणूक करणारी व्यवस्थाच उधळून लावली. अशा पुस्तकांनी भांडवलदारांना आणि हुकूमशहांना झोप उडवून टाकली. पुस्तकांनी समाज ढवळून काढला. रशियन क्रांती आणि पुस्तके यांचे नाते होते. घनिष्ठ होते. वैचारिक मंथन होत होते. वर्गव्यवस्थेत केलेल्या शोषणाविरूद्ध लढ्याचा सार्थ अभिमान वाटणारी आई जनजागृतीचे पत्रके लोकांपर्यत पोहोचवत असे. लढ्याच्या माध्यमाने प्रत्येकाच्या ह्रदयात उजेड पोहोचविण्याचे भान या आईला होते. असे कित्येक आई-वडील भारतातील स्वातत्र्य आंदोलनात व व्यवस्था परिवर्तनाच्या लढ्यात होते. साहित्य महत्वाचे कसे योगदान देते ते तपासावे लागेल.

थॉमस पेनच्या 'कॉमन सेन्स' नावाच्या सत्तेचाळीस पानाच्या पुस्तिकेने अमेरिकेच्या स्वातंत्र्याचा ठराव माडंला व राज्यक्रांती झाली. देशनिष्ठा, व्यक्तीस्वातंत्र्य, माणसाच्या आपेक्षा, श्रद्धा, आदी विचारप्रणाली मानवी मूल्ये प्रभावी ठरली. क्रांतीकारक विचार पुरविल्याशिवाय जनसामान्य क्रांतीकारक परिवर्तन घडविणे शक्य नाही हे पुस्तकेच करू शकतात. हे इतिहासाने सिद्ध केले आहे.

आज प्रत्येकजन सत्तेची स्वप्न पहात आहे. वरिष्ठ सत्ताधिश समाजातील जाती व धर्माच्या गटाच्या आधारे छोटे छोटे तुकडे करून राजकारण होत आहे. यामुळे छोट्या गटांना अंकित करून आपण अमर्याद सत्ता उपभोगता येणे हे रूढ होत आहे. अपार संपत्ती, सुखसोई, नोकरचाकर, प्रतिष्ठा, प्रसिद्धी, पुरस्कार, वैभव अशा अनेक गोष्टी सत्तेसोबत भरजरी वस्त्र घालून येत असतात. यासाठी सत्ता (ंुशी) मिळवण्यासाठी अटीतटीची स्पर्धा चालु आहे. त्यामुळे घराणेशाही, लाचारी, विश्वासघात, भ्रष्टाचार, झुंडशाही अशा देशविघातक विकृती दिसू लागल्या आहेत.





व्यक्ती समाजात आणि समाज व्यक्तिला नीतिभ्रष्टतेकडे घेऊन जाताना दिसतो आहे. त्यामुळे अराजकतेचा धोका जास्त दिसत आहे. व्यक्तिस्वातंत्र्य, बधुत्व आणि समानता टिकून राहाणे महत्वाचे आहे. शेवटी सत्तेचे तत्वज्ञान, समानता व बधुत्वाचे तत्वज्ञान, आणि स्वातंत्र्याचे तत्वज्ञान यातून एकाची निवड करण्याची नितांत गरज आहे. सध्या हीच खरी भारतात एकविसाव्या शतकाची मागणी आहे.

मूलतः लोकशाही मूल्ये तथागत भगवान गौतम बुद्ध यांनी रुजविली. बुद्ध तत्वज्ञानात रूढ असलेली समता, स्वातंत्र्य बंधुत्व आणि न्याय हि मूल्ये लोकशाही प्रगल्भ आणि प्रभावी करण्यात मदत झाली. डॉ बाबासाहेब न्हणतात की लोकशाही मूल्ये मी फ्रेंच राज्यक्रांतीतून नवे तर बुद्धतत्वज्ञानातून घेतले आहेत. नव्हे तर यापुढे यातून त्यांनी बौद्धधम्माचा अंगीकार केला. समाजवादी अर्थव्यवस्था भारतूय राज्यघटनेचे अविभाज्य अंग बनावे यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केला. लोकशाही मुल्ल्याविषयी नितांत आदर होता. कारण लोकशाहीत माणूस हा एकव्यक्ती एक मूल्यवादी असतो. यामुळे त्याला सामंत व प्रतिष्ठा प्राप्त होते. उदारमतवाद यांनाही मोठे उत्तेजन मिळणे. लोकशाही आणि सेक्युलर दृष्टिकोनास उत्तेजन मिळते. यामुळे ईश्वर संकल्पना धर्मव्यवस्था आणि समाज यांची नेहमी घुसलं चालू असते. व्यक्तिस्वातंत्र, उदारमतवाद आणि धर्मनिरपेक्षता याना अन्यन्यसाधारण महत्व आले. गेल्या विसाव्या शतकात ईश्वर नि धर्म यांच्या सर्वांगीण प्रभावाला ओहोटी लागली. प्रचलित समाजव्यवस्थेत मानवी मुल्यानं प्रोत्साहन मिळाले. विज्ञान, उद्योग व्यापार, शिक्षण या क्षेत्रात हझपाट्याने विकास होत गेला धर्माचा व अध्यात्माचा ऱ्हास होत गेला. जगाची निर्मिती कशी झाली याचे आज तरी विज्ञान जवळ उत्तर नाही. म्ह्णून त्यांनी इळस इरपस ढहशीू मांडली. विज्ञानचा वेध घ्यायचा प्रयत्न झाला. परंतू जगाची पुनर्चना करणे हे समाजवादी बौद्धधम्माचे उदिष्ट आहे. धर्म म्हणजे रिलिजन. The purpose of Religion is to explain the origin of the world and the purpose of Dhamma is to reconstruct the world. धर्मानी माणसाचा विवेक नष्ट केलेला आहे. आणि वस्तूस्थितीशी असणारा विवेक, वास्तवाशी असणारे भान त्याचा विसर पडून देव आणि दैवावर विश्वास ठेवला जात आहे. धर्माचे विषय म्हणजे देव आत्मा, प्रार्थना, पूजाकर्मकांड, विधी, समारंभ आणि यज्ञ हे होत. धम्मात यांना स्थान नाही. माणसानी भाणसावर प्रेम केले पाहिजे. धम्म म्हणजे नीती. एकूनच नीती धम्माचे सार आहे. हीच नीती धर्मात प्रभावशाली ठरत नाही. तथापि धम्मानी माणसाचा विवेक जागृत केलेला आहे. हे आवर्जून नमूद करावे लागेल. कारण भारतातील संघर्ष इथल्या वर्गाना मान्यता देऊन अपरिवर्तनिय बनलिले आणि चातुर्वण्याचा सिद्धांत दैवी आणि पवित्र मानला.

म्हणून राजसतेविरूद्ध संघर्ष सुरू राहिला. वर्णव्यवस्था आणि जातीव्यवस्थेचा पुरस्कार केल्याने अनेक अडथळे येत आहेत. सारे प्रश्न आर्थिक नाहीत. वेगवेगळ्या पातळीवरचे आहेत.

धर्म वा ईश्वर संकलपनेचे वेध घेतला असता असे दिसून येते की, एकोणिसाव्या शतकात ईश्वर आणि धर्म यांवर प्रखर हल्ले झाले आहेत.फ्रेडरिक नित्शे, कार्ल मार्क्स, बर्ट्रान्ड रसेल, अरबेर्ट स्पेन्सर, देकार्त, स्पिनोझा, सिगमंड फ्राईड, इत्यादी विचारवंतांनी ईश्वर नाकारला. तर कांट, हेगेल, आणि रुसो ईश्वरवादी होते.

फ्रेडरिक नित्शेनि नीती दोन प्रकार मानले. एक, मालकाची नीती आणि दुसरी गुलामांची नीती. मालकाच्या नीतीत सृजनता असते आणि गुलामांच्या नीतीत नकारात्मकता असते. मालक शक्तिशाली, सकारात्मक, कार्यकर्तुत्वान जीवनपद्धती असते तर गुलामांच्या नीतीत आत्म क्लेश, नकार, दुर्बलता असते. धर्मानी दुर्बल माणसांना प्रोत्साहन दिले. धर्म माणसाला शेवटी काय शिकवतो ? आपला दुःखभोग सहन करा, प्रतिकार करू नका, देव ठेवलं तसे राहा, देवावर आणि दैवावर विस्वास ठेवा. ढेवती धार्मिक दृष्टीतून यातानाच आकर्षक ठरतात. जे नष्ट कार्याला हवे ते टिकून ठेवण्याची धर्माची प्रवृत्ती दिसून येते. माणसातले सामर्थ्य, आशावाद, आनंद आणि सुंदरता याना नकार दिला जातो. म्हणजे जीवनावर प्रभुत्व गाजवण्याऐवजी जीवनाविषयी तिरस्कार शिकवलं जातो. आत्मा, स्वर्ग, मोक्ष इत्यादी बुजगावणे उभी केली जातात. यात माणूस दुर्बलता जातो. यावर एकाच उपाय कि मानवी जगाची व्यवस्था लावणारा सामर्थ्य शाली इच्छेने प्रेरित झालेला माणूस श्रेष्ठ आहे.

कार्ल मार्क्स एक उत्कृष्ट अर्थशास्त्रज्ञ व तत्वज्ञ होते. त्यांनी १८४८ कम्युनिस्ट विचारसरणीचा पाया घातला. मार्क्स देखील असेच सर्वात पाखंडी होते. त्यामुळे धर्ममार्तंडाचा सर्वाधिक राग त्यांच्यावर होता. त्यांनी धर्म अफुची गोळी आहे असे मत व्यक्त केले होते. १८४४ च्या लेखात त्यांनी 'माणूस धर्म निर्माण करतो. धर्म माणसाला निर्माण करीत नाही.' त्यामुळे मार्क्सने देखील माणूस हा केंद्रबिंदू मानला. आपल्या जाणीवावरून आपले अस्तित्व ठरत नसते. आपल्या अस्तित्वाचा आपल्या जाणिवांवर निर्णायक प्रभाव पडतो. माणसाची जाणीव होऊ बसते. धार्मिक यातनांतून विद्रोह निर्माण होतो. धार्मिक व्यथा या दिन शोषितांच्या असतात. त्यामुळे निर्दयता निर्माण होते आत्मा नसलेल्या परिस्थितीचा बनतो. ती लोकांची अफू (गोळी ) असते. धर्म दलित शोषितांचे दुःख विसरण्याचे साधन असते. धर्माचे निर्दालन म्हणजे सुखाचे उच्चाटन करणे होय. धर्म आणि देव यांच्या ऐवजी त्याने माणसाचे गीत गेले पाहिजे. धर्माच्या उचाटनामुळे माणूस वास्तवाकडे स्वछ, सुबुद्धीने पाहू लागेल. तेव्हा धर्म एक पलायन थाट. निषेध ठरते. धर्माला दूर सारून स्वतःला बदलण्याचा प्रयत करणे शिकले पाहिजे. आपण राहत असलेल्या जगाचे खरे स्वरूप श्रमिकांनी समजावून घेतले पाहीजे. आपल्या शोषणाची जाणीव त्यांना झाली पाहिजे. धर्माच्या अफूने श्रमिकांची दिशाभूल होते असे मार्क्सला वाटते.

शेवटी कला आणि साहित्य महत्वाचे ठरले आहे. कल्पना शक्ती हीच विस्वसाहार्य ठरली आहे. तेव्हा कलेचे प्रयोजन काय. इटालियन तत्वज्ञ व्हीको ने मत मांडले कि माणसाच्या प्रगतीला विज्ञान नव्हे तर कला साहाय्य्यभुत ठरेल. तेव्हापासून कलेच्या सामाजितक प्रभावाचा विचार होऊ लागला. धर्म, विज्ञान आणि कला याच्या स्वरूपाचा आणि कार्यपद्धतीचा विचार केला. तर धर्म अमूर्त ( ईश्वर ) संकल्पनेच्या आधारावर वास्तव जीवन बांधणीचा प्रयत करतो. त्यामुळे धार्मिक मूल्यांचा आधार पक्का असत नाही. विज्ञानाचे कार्य प्रत्यक्ष अनुभवावर अनुमानित असल्याने मूल्यांचा प्रश्न निर्माण होत नाही. कलानिर्मिंती हि प्रत्यक्ष अनुभवातून होते. अनुभव हेच मूल्य ठरते. धार्मिक आदेश आग्रही, आक्रमक असतात; कला मूल्यात्मक अनुभव अनाग्रही वृत्तीने येते, तर विज्ञान मुल्ले देत नाही. मूल्ये हवीत, पण त्याची सक्ती नको. या अडचणीत सापडलेल्या माणसाला कलेकडे वळणे योग्य ठरते. बकाल, भ्रष्ट, हिंसक जीवनाकडे वळणाऱ्या संस्कृतीला आधार कला शक्तीच आहे. धर्मामुळे माणसाच्या मुळाशी संपर्क संपला. उरला फक्त कायद्याशी. जीवनाला मूल्यहीनता आली. अशावेळी दोन मार्ग आहेत. एक, परंपरागत श्रद्धांना चिकटून जगणे, आणि निराधार होऊन अराजकाने जगणे. यामुळे समाजात भीतीत, भ्रष्टचार, तत्वहीनता, संकुचित दृष्टीकोन , हिंसाचार, व्यभिचार, अत्याचार घडत असतो. यात खरा सौदंर्याचा अभाव असतो. यासाठी टी. एस. इलियट विचारतो,

Where is the life we have lost in living ?
Where is the wisdom we have lost in knowledge ?
Where is the knowlege we have lost in information ?

जगण्यात हरवलेले जीवन कुठे आहे ?
ज्ञानात हरवलेले शहाणपण कुठे आहे ?
माहितीत हरवलेले ज्ञान कुठे आहे ?

माहिती म्हणजे ज्ञान नव्हे. किंवा ज्ञान म्हणजे शहाणपण नव्हे आणि जगणे म्हणजे जीवन नव्हे. परंतु हे खरे आहे की, माहितीशियाय आणि ज्ञाना नाही. जसे जगण्याशिवाय जीवन कठीण. कला हा आधुनिक जगाचा धर्म आहे. कला सध्याचे तत्वज्ञान आहे. ते समजून घेऊन प्रवास केला तर तो भयावह ठरणार नाही....!!!

संदर्भ सूची :

१ शिरवाडकर, के. र. ; आपले विचारविश्व; राजहंस प्रकाशन, पुणे ; फेब्रुवारी २०१३.

२. आंबेडकर, भि. रा. ; भगवान बुद्ध आणि त्यांचा धम्म; विशेष आवृत्ती १९९७.

२. गायकवाड, दत्तात्रय; शतकोत्तर आंबेडकर विचार, फेब्रुवारी २०१९; स्वंयदिप प्रकाशन, पुणे

३. गायकवाड, दत्तात्रय; डॉ बाबासाहेब आंबेडकरांचे तत्वज्ञान : आशय व विश्लेषण, स्वंयदिप प्रकाशन, पुणे; २०१६;

_– डॉ दत्तात्रय गायकवाड
(मो. ९८६०५९१४०५)

## एअर मार्शल अमर प्रीत यांची एअर चीफ मार्शलच्या प्रमुखपदी नियुक्ती

(पान १ वरून..) आहे. त्यांनी ऑपरेशनल फायटर स्कॉड्रन आणि फ्रंटलाइन एअर बेसचे नेतृत्व केले आहे.

चाचणी पायलट म्हणून त्यांनी मॉस्कोमध्ये मिग-२९ अपग्रेड प्रोजेक्ट मॅनेजमेंट टीमचे नेतृत्व केले. ते राष्ट्रीय उड्डाण चाचणी केंद्रात प्रकल्प संचालक (उड्डाण चाचणी) देखील होते आणि त्यांना तेजस या हलक्या लढाऊ विमानाच्या उड्डाण चाचणीचे काम देण्यात आले होते.

एअर मार्शल सिंग यांनी साउथ वेस्टर्न एअर कमांडमध्ये एअर डिफेन्स कमांडर आणि इस्टर्न एअर कमांडमध्ये वरिष्ठ हवाई कर्मचारी अधिकारी या महत्त्वाच्या कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या केल्या आहेत. हवाई दलाच्या उपप्रमुखपदाचा कार्यभार स्वीकारण्यापूर्वी ते केंद्रीय हवाई कमांडचे एअर ऑफिसर कमांडिंग-इन-चीफ होते.

## मुख्यमंत्रिपदी आतिशी विराजमान! दिल्लीच्या सर्वात तरुण मुख्यमंत्री

(पान १ वरून..) शिक्षणासाठी ऑक्सफर्ड विद्यापीठात गेल्या. २०१२ मध्ये आम आदमी पक्षाची स्थापन झाली, आतिशी या २०१९ मध्ये सक्रिय राजकारणात आल्या. त्यावेळी पक्षाने आतिशी यांना पूर्व दिल्लीतून भाजपचे उमेदवार गौतम गंभीर यांच्या विरोधात उमेदवारी दिली होती. यात आतिशी यांचा या निवडणुकीत चार लाखांहून अधिक मतांनी पराभव झाला, त्या तिसऱ्या क्रमांकावर होत्या. मात्र, पुढच्या वर्षी कालकाजी विधानसभेच्या निवडणुकीत पक्षाने त्यांना उमेदवारी दिली आणि त्या विजयी झाल्या. तीन वर्षांनंतर मनीष सिसोदिया यांच्या राजीनाम्यानंतर त्या दिल्ली सरकारमध्ये मंत्री झाल्या. २०१९ ते २०२४ अवघ्या पाच वर्षांत त्यांनी मुख्यमंत्रिपदापर्यंत मजल मारली आहे ही बाब महत्त्वाची आहे.

आतिशी या दिल्लीच्या तिसऱ्या महिला मुख्यमंत्री आहेत. त्याआधी भाजपाच्या सुषमा स्वराज आणि काँग्रेसच्या शीला दीक्षित यांनी दिल्लीचं मुख्यमंत्रिपद सांभाळलं आहे. १९९८ मध्ये सुषमा स्वराज या ५२ दिवसांसाठी मुख्यमंत्री झाल्या होत्या. तर १९९८ मध्ये शीला दीक्षित या १५ वर्षे २५ दिवसांसाठी मुख्यमंत्री होत्या. दीर्घ काळ मुख्यमंत्री राहण्याचा रेकॉर्ड हा शीला दीक्षित यांच्या नावे आहेत. यानंतर आता आपच्या नेत्या आतिशी दिल्लीच्या मुख्यमंत्री झाल्या आहेत.

## भविष्यातील पाणीटंचाई टाळण्यासाठी देशातील २० नद्या एकमेकांशी जोडणार : केंद्रीय मंत्री सी. आर. पाटील

(पान १ वरून..) वाचले आहेत. त्या वेळेचा उपयोग आर्थिक स्वावलंबनासाठी होऊ लागला आहे. शुद्ध पाणी घरी आल्यामुळे जलजन्य आजार कमी होऊन औषधावरील खर्च कमी झाला. जलसंधारणाच्या अनेक योजनांना गती देण्यात येत आहे. यामध्ये रेन वॉटर हार्वेस्टिंगला प्राधान्य देण्यात आले आहे. जगाच्या १८ टक्के लोकसंख्या भारतात आहे. या तुलनेत स्वच्छ व पिण्यालायक पाणी केवळ ४ टक्के उपलब्ध आहे. भविष्यात देशातील लोकसंख्या, पशुधन, शेती यांना पाण्याची पुरेशी उपलब्धता असावी यासाठी पुढील दोन महिन्यात देशातील २० नद्या एकमेकांशी जोडण्याचे काम करण्यात येणार आहे. त्यामुळे प्रत्येकाला पर्याप्त पाणी उपलब्ध होऊ शकेल. पाण्याची कमतरता भरुन काढण्यासाठी सर्वतोपरी कामे सुरु आहेत. यास समाजाचाही पाठिंबा आवश्यक आहे. पुढील काळात प्रत्येक घरावर रेनवॉटर हार्वेस्टिंग करण्यात येईल. भावी पिढीला पाण्याची कमतरता भासू नये यासाठी सर्वांच्याच प्रामाणिक प्रयत्नांची गरज आहे. नाम फाऊंडेशनच्या माध्यमातून होत असलेले काम यादृष्टीने अत्यंत प्रशंसनीय आहे.

**जलयुक्त शिवार योजना यशस्वी करण्यामध्ये 'नाम' फाउंडेशनचा मोठा वाटा –उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

नाम फाउंडेशनने राज्यातील सर्वाधिक दुष्काळी भागात परिवर्तन घडवून आणले. जलयुक्त शिवार योजना यशस्वी करण्यामध्ये नाम फाउंडेशनचा मोठा वाटा आहे. देशातील सर्वांत जास्त मोठी धरणे महाराष्ट्रात आहेत. महाराष्ट्रातील ५५ टक्के भाग अवर्षणप्रवण आहे. महाराष्ट्रातील पाणी समस्येवरील उपाय शोधण्यासाठी जलयुक्त शिवार कार्यक्रमाची शासनाने आखणी केली. या कार्यक्रमाला नाम फाऊंडेशनने लोकचळवळीत रुपांतरीत केले.

उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, नाम फाउंडेशनने एक हजार पेक्षा जास्त गावांमध्ये वेगवेगळी कामे केली. दुष्काळी भागातील जलसंधारणाची कामे, शेतकऱ्यांच्या मुलांना शिक्षण, मुलींचे लग्न, महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचे काम त्यांनी केले. सर्वसामान्यांची दुःखे आत्मसात करुन नाम कार्य करत आहे. महाराष्ट्रात जोपर्यंत जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर होणार नाहीत, पाण्याचा थेंब न थेंब जोपर्यंत जमिनीत मुरणार नाही, तोपर्यंत शेतकरी आत्महत्या थांबणार नाहीत. हे ओळखून शासनाने जलयुक्त शिवार ही योजना प्राधान्याने राबविली. त्यातून मोठ्या प्रमाणात पाणी साठवण झाली. अनेक गावे पाणीदार झाली आहेत. जलसंधारणामुळे शेती समृद्ध झाली. हे काम अव्याहत चालणारे असून जलसंधारणाच्या कामाला अधिक गती देण्यासाठी नाम फाउंडेशन सारख्या अन्य संस्थानी एकत्र येऊन काम करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केले. यावेळी नाम फाऊंडेशनबद्दल बोलताना ते म्हणाले, नाम फाऊंडेशनने लोकांची मानसिकता बदलली. लोकांना पाण्याचे इंजिनिअरिंग शिकविले. ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांच्यात सामान्य माणसाचे दु:ख जगण्याची क्षमता असल्यामुळे अनेक लोक त्यांच्याशी जोडले गेले. त्यांच्या संस्थेचे कार्य अत्यंत प्रेरणादायी आहे. समाजपरिवर्तन घडवू शकतो हे त्यांनी दाखवून दिले आहे.

**नाम फाऊंडेशनचे काम भविष्यातील कार्याला उर्जा देणारे– उद्योगमंत्री उदय सामंत**

नाम फाऊंडेशनचे कार्य अत्यंत प्रामाणिक आणि पारदर्शी असून कौतुकास्पद आहे. सामाजिक कार्य करणारे ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांचा महाराष्ट्राला सार्थ अभिमान असून त्यांचे काम भविष्यातील कार्याला उर्जा देणारे आहे, असे गौदवोद्गार उद्योगमंत्री उदय सामंत यांनी काढले.

नाम फाऊंडेशनने विविध क्षेत्रात केलेल्या विधायक आणि पारदर्शी कामाचा आदर्श सर्वांनी घ्यावा. कंपन्यांनी त्यांना मिळणारा सीएसआर फंड सामाजिक उपक्रमांना मोठ्या प्रमाणात द्यावा असे आवाहन मंत्री श्री. सामंत यांनी केले. यावेळी मंत्री श्री. सामंत यांच्या हस्ते नाम फाऊंडेशनचे विश्वस्त, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, एनडीआरएफच्या जवानांचा स्मृतीचिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाला सीआरपीएफचे पोलीस उपमहानिरीक्षक श्री. निंबाळकर, नाम फाऊंडेशचे सदस्य मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Daydev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## गुन्हेगारी जगत...

### शासकीय मैदानावरून दुचाकी लंपास

सोलापूर (प्रतिनिधी) शासकीय मैदान येथे हँडल लॉक करून ठेवलेली दुचाकी क्रं.एमएच.१३.सीवाय.३८९० हि अज्ञात चोरट्याने १७ सप्टेंबर रोजी चोरून नेल्याची घटना घडली.याप्रकरणी ओंकार बसवराज होमसठ (वय-२७,रा.पापाराम नगर,विजापूर रोड) यांनी विजापूर नाका पोलीस ठाण्यात फिर्याद केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोराविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस शिर्के हे करीत आहेत.

### सात रस्ता येथील अपघात प्रकरणी डंपर चालकावर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) भरधाव वेगाने व निष्काळजीपणाने डंपर चालवून दुचाकी क्रं.एमएच.१३.सीडब्लू.३७६९ यावरील चालक बाळासाहेब विश्वनाथराव कुलकर्णी (वय-८१,रा.गणेश नगर,योगक्षेम सोसायटी,जुळे सोलापूर) यांना पाठीमागून धडक देऊन गंभीर जखमी करून मृत्यूस कारणीभूत ठरल्याप्रकरणी डंपर क्रं.एम एच.१३.डीक्यू.६८५६ यातील चालक फरीद नशीर शेख (वय-३५,रा.मु.पो.उळेवाडी ता.उत्तर सोलापूर) यांच्याविरुद्ध सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.याप्रकरणी गणेश बाळासाहेब कुलकर्णी (वय-४५,मु.पो.जेऊर,ता. अक्कलकोट) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून फरीद शेख याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.ही घटना २० सप्टेंबर रोजी दुपारी तीन वाजण्याच्या दरम्यान चितळे हॉस्पिटल समोर सात रस्ता येथे घडली. पुढील तपास पोसई.पाटील हे करीत आहेत.

### विवाहितेचा छळ करत मारहाण

सोलापूर (प्रतिनिधी) विवाहित हि सासरी नांदत असताना घरातील कामे लावून रात्री फक्त एक चपाती व भाजी खायचे असे सांगून त्रास देऊन हुंड्याची राहिलेली एक लाख रुपये रक्कम घेऊन ये नाहीतर तुला मी वेडी ठरवेल असे म्हणून शारीरिक व मानसिक त्रास देऊन छळ करत मारहाण केल्याची फिर्याद ऐश्वर्या महेश माने (वय-२५,रा.एनजी मिल चाळ,मुरारजी पेठ) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात दिली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून महेश चंद्रकांत माने (रा.युगंधर हॉस्पिटल मागे,स्वामी समर्थ नगर,होटगी रोड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार रावजी हे करीत आहेत.

# जिजामाता होत्या जगन्मातेचा अंश असलेली सर्वश्रेष्ठ स्त्री

## प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी : छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेस प्रारंभ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनिधी : हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मातोश्री जिजामाता जगन्मातेचा अंश असलेली सर्वश्रेष्ठ स्त्री होत्या, असे गौरवोद्गार श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे कोषाध्यक्ष प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी काढले.

सकल हिंदू समाजातर्फे जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये आयोजित छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेस गुरुवारी प्रारंभ झाला.

कथेच्या पहिल्यादिवशी 'शिवजन्म पूर्वकाळ, तत्कालीन परिस्थिती ते शिवजन्म' या विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले. प्रारंभी छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या मूर्तीचे आणि भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी म्हणाले, छत्रपती श्री शिवरायांच्या जन्मापूर्वी मुघलांनी भारतातील अनेक हिंदू साम्राज्ये उध्वस्त करून अनन्वित अत्याचार केले. मुघलांकडून हिंदूंवर होणारे अत्याचार, आपसातील भांडणे आणि त्यातून भारतासमोर निर्माण होणाऱ्या समस्या मातोश्री जिजामाता पाहत होत्या.

ही परिस्थिती पालटून टाकावी अशी शहाजी महाराज आणि जिजामाता यांची मनोमन इच्छा होती. ही इच्छा उराशी घेऊनच जिजामातांनी छत्रपती श्री शिवरायांना जन्म दिला. जिजामातांच्या अंत:करणातील भगवदभक्तीप्रमाणे सध्याच्या महिला भगिनींनीही देव, देश, धर्माबद्दल श्रद्धा बाळगली पाहिजे, असेही प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी यांनी सांगितले. यावेळी समर्पित नाट्यशाळेच्या कलाकारांनी शिवजन्माचा प्रसंग सादर केला.

### सहभागी होण्याचे आवाहन

छत्रपती श्री शिवाजी महाराज कथेच्या दुसऱ्या दिवशी प. पू. स्वामी गोविंद देव गिरिजी 'शिवसंस्कार' या विषयावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या चरित्रातील काही अंश उलगडून दाखवणार आहेत. त्याकरिता सोलापूरकरांनी दुपारी ४ वाजता जुनी मिल कंपाऊंड येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये उपस्थित रहावे, असे आवाहन सकल हिंदू समाजातर्फे करण्यात आले आहे.



श्री राम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र अयोध्याचे आर्थिक सल्लागार समितीचे प्रमुख सी. ए. राजगोपाल मिणियार यांनी प्रास्ताविक तर गुरूशांत धुत्तरगांवकर यांनी सूत्रसंचालन केले.

# हिंदु बांधवांच्या भावना दुखावणाऱ्या ज्ञानेश महाराव व इतरा विरुद्ध गुन्हा दाखल करा




**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : हिंदूंचे आराध्य दैवत श्री प्रभु रामचंद्र, लक्ष्मण माता सीता, माता उर्मिला तसेच श्री स्वामी समर्थ यांच्याबद्दल वादग्रस्त, आक्षेपार्ह व अपमानकारक वक्तव्य करून हिंदु धर्मियांच्या भावना दुखावणाऱ्या ज्ञानेश महाराव व इतरांविरुद्ध गुन्हा दाखल करून त्यांना अटक करावी याबाबतची तक्रार नळदुर्ग येथील माजी नगरसेवक संजय बताले यांनी नळदुर्ग पोलिस ठाण्यात दिली आहे.

या तक्रारी अर्जात संजय बताले यांनी म्हटले आहे की,ज्ञानेश महाराव याने हिंदु धर्मियांचे आराध्य दैवत असलेल्या श्री प्रभु रामचंद्र यांच्यासह श्री स्वामी समर्थ व इतर देवदेवतांविषयी अतिशय अपमानकारक वक्तव्य करून हिंदु धर्मियांच्या भावना दुखावण्याचे काम केले आहे. ज्ञानेश महाराव हा समाजात जातीय द्वेष निर्माण करण्याचा प्रयत्न करीत आहे. त्याचबरोबर असे वक्तव्य करून दंगली घडविण्याचा प्रयत्न ज्ञानेश महाराव हा करीत आहे. त्यामुळे पोलिसांनी तात्काळ ज्ञानेश महाराव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी अशी मागणी या तक्रारी अर्जात संजय बताले यांनी केली आहे.

दि. १२ सप्टेंबर रोजी सकाळी ११: ०० वाजता माजी नगरसेवक संजय बताले, बसवराज धरणे, दयानंद स्वामी,व्यापारी मंडळाचे मुकुंद नाईक,विलास येडगे,संजय विठ्ठल जाधव,सतीश पुदाले,अमर भाळे,विजय ठाकुर, गजानन हळदे, गणेश मोरडे, अक्षय भोई, संगमेश्वर व्हनाळे यांच्यासह युवकांनी नळदुर्ग पोलिस ठाण्यात जाऊन पोलिस निरीक्षक गजेंद्र सरोदे यांची भेट घेऊन ज्ञानेश महाराव याच्या विरुद्ध गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्याची मागणी केली आहे.

# शैक्षणिक प्रगती बरोबर मानवतावाद सामाजिक व सांस्कृतिक वारसा जोपासणे महत्वाचे : सुनील पुजारी

### धरित्री विद्यालयात उत्कृष्ट पालक पुरस्कार संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे

शिक्षण हे मानवाच्या कल्याणासाठी आणि शैक्षणिक दृष्ट्या सक्षम करण्यासाठी किंवा जीवनात यशस्वी होण्यासाठी महत्वाचे असते शैक्षणिक प्रगती बरोबर मानवतावाद सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करणे किंवा त्याचा वारसा जोपासने आवश्यक असते कारण या मधुनच विद्यार्थाना प्रेरणा व बळ मिळते, आसे परखड मत धरित्री विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुनिल पुजारी यांनी केले. नुकताच नळदुर्ग आलीयाबाद येथे ज्ञानदीप कलोपासक मंडळ नळदुर्ग संचलित धरित्री विद्यालय येथे पालक स्नेह मेळावा व उत्कृष्ट पालक सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता त्यावेळेस ते अध्यक्षीय भाषणात बोलत होते.

प्रथमता शाळेचे मुख्याध्यापक तथा महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त सुनील पुजारी शाळेतील ज्येष्ठ शिक्षक अण्णाप्पा सातलगावकर व पाहुण्यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले . दहावीच्या विद्यार्थिनींनी स्वागत गीत सादर केले कार्यक्रमाचे प्रास्ताविक अण्णाप्पा सातलगावकर यांनी केले. प्रास्ताविक मध्ये त्यांनी शिक्षक पालक संघाची भूमिका व उत्कृष्ट पालक सन्मना मागील शाळेचा हेतू स्पष्ट केला. शाळेतील सर्व शिक्षकांनी थोडक्यात वर्गाचा आणि विषयाचा अहवाल सादर केला.

शाळेला सहकार्य करणारे व विद्यार्थ्यांच्या विकासासाठी झटणाऱ्या काही पालक प्रतिनिधींचा उत्कृष्ट पालक सन्मान सोहळा साजरा करण्यात आला. यामध्ये महादेव अंकुश पवार, दादासाहेब बनसोडे, सुनील बलभीम पिस्के, सविता बुद्धवंत चव्हाण, सोमनाथ विजय म्हेत्रे, जयसिंग शिवप्पा गवळी, शंकर नातू राठोड, रेणुका मिलिंद भूमकर, सुनीता उत्तम वाघमारे, दामाजी सिताराम राठोड, विलास तुकाराम चव्हाण, तन्वीर अहमद हुसेन कुरेशी,अनिता गोविंद किल्लेदार, कलावती सुनील पवार या पालकांचा शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांच्या हस्ते शाल, उत्कृष्ट पालक सन्मानचिन्ह, स्मरणिका व नॅपकिन बुके देऊन सत्कार करण्यात आला यानंतर शाळे मध्ये इयत्ता नववी व दहावीच्या विद्यार्थ्यांना विनामूल्य गणित व विज्ञान शिकवणारे सांची जयसिंग गवळी व सुरज संभाजी कांबळे या माजी विद्यार्थ्यांचा सत्कार शाळेचे मुख्याध्यापक सुनील पुजारी यांच्या हस्ते शाल सन्मानचिन्ह, स्मरणिका व नॅपकिन बुके देऊन करण्यात आला. यानंतर शाळेतील शिक्षक रमेश चव्हाण यांना मिळालेल्या महाराष्ट्र राज्य शासन आदर्श शिक्षक पुरस्कारा बद्दल त्यांचा शाल,स्मरणिका व गुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

यानंतर सत्कार मूर्तींनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्व पाल्यांनी शाळेत घेतल्या जाणाऱ्या विविध उपक्रमाबद्दल समाधान व्यक्त केले. मुर्टा येथील पालक जयसिंग गवळी पत्रकार दादासाहेब बनसोडे यांनी उत्कृष्ट पालक सन्मान हा शाळेचा एक प्रेरणादायी उपक्रम असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शुभांगी कारंजे यांनी केले तर पालकांचे आभार शुभांगी कलवले यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मुख्याध्यापक सर्व शिक्षक वृद्ध शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे परिश्रम घेतले.

# उल्हासनगर शहरामध्ये प्रोजेक्ट लाडली या उपक्रमाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

आशा रणखांबे /ठाणे /उल्हासनगर : महिला व किशोरवयीन मुली यांच्यासाठी मासिक पाळी आणि संबंधित स्वच्छतेबद्दल सविस्तर माहिती व्हावी यासाठी प्रोजेक्ट लाडली या उपक्रमाचे आयोजन दिवंगत डॉ. कमलिनी गौतम बस्ते यांच्या स्मरणार्थ नुकतेच वीर तानाजी नगर, उल्हासनगर पाच येथे करण्यात आले.



पगारिया वेल्फेअर फाऊंडेशन नवी मुंबई, श्रावस्ती युवा सेवाभावी संस्था उल्हासनगर , बौद्ध विहार संघटना समन्वय समिती ठाणे आणि महामाया असंघटित महिला कामगार संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने या उपक्रमाचे आयोजित करण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये महामाया असंघटित महिला कामगार संघटनेच्या अध्यक्षा तसेच बौध्द विहार संघटना समन्वय समितीचे शैक्षणिक विंग प्रमुख विजय हळदे यांचे मनोगत झाल्यानंतर श्रावस्ती युवा सेवाभावी संस्थेच्या प्रतिनिधी व काऊन्सलर ड. प्रज्ञा राऊत यांनी महिला व किशोरवयीन मुली यांच्यासाठी मासिक पाळी आणि संबंधित स्वच्छतेबद्दल महत्त्वापूर्ण माहिती देऊन संवाद साधला तसेच माहितीपुस्तिका आणि व्हिडिओ क्लिप मार्फत उपस्थित महिलांना व किशोरवयीन मुलींना मार्गदर्शन केले. महिलांच्या आरोग्य व्यवस्थित राहावं यासाठी वस्ती वस्तीवर, तसेच किशोरवयीन मुलीसांठी शाळांमध्ये अश्या प्रकारे उपक्रम भविष्यात घेण्यात येतील, असे आश्वासन श्रावस्ती युवा सेवाभावी संस्थेचे अध्यक्ष इं. गौतम बस्ते यांनी दिली.

या उपक्रमाच्या कार्यक्रमात उल्हासनगर मधील पत्रकार शशिकांत दायमा तसेच अँड मानसी खिस्मतराव यांची देखिल उपस्थिती लाभली. या कार्यक्रमात केक कापुन तसेच मेन्स्टुपिडिया या पुस्तिकेचे वाटप करुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# पुनम कामठे यांची हिवरे गावच्या सरपंचपदी बिनविरोध निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुरंदर, (प्रतिनिधी) : हिवरे ग्रामपंचायतच्या सरपंच सौ भारती गायकवाड यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या सरपंच पदाची निवडणूक घेण्यात आली, पुनम कामठे यांचा एकमेव अर्ज आल्यामुळे निवडणूक निर्णय अधिकारी सुहास कांबळे यांनी त्यांना बिनविरोध सरपंच पदी निवड झाल्याचे जाहीर केले.त्यांना सहकार्य तलाठी भाऊसाहेब कल्पेश कटारे, ग्रामसेविका महादेवी हरपळे, यांनी केले. मला जी ग्रामस्थांनी सरपंच पदी निवड करून काम करण्याची संधी दिली त्याचा मी गावासाठी व गावच्या विकासासाठी वेळ देऊन काम करेन, त्यामध्ये प्रामुख्याने महिलांच्या अडीअडचणी, रस्ते, आरोग्य, वीज, पाणी या मूलभूत गरजा वर जास्त भर देऊन चांगल्या प्रकारचे काम करण्याचा माझा प्रयत्न राहील, तसेच शासनाच्या विविध योजना सर्वसामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचा निश्चित प्रयत्न करेल. सदर सरपंच निवड कार्यक्रमाला हिवरे गावाचे माजी सरपंच श्री एम. के.( नाना )गायकवाड, गुलाब (तात्या ) गायकवाड, धर्मबापू गायकवाड, माजी सरपंच भारती गायकवाड व त्यांचे सहकारी ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत सदस्य सोनाली चव्हाण, व महिला भगिनी, ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.



## निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने आ. गायकवाड व बोंडे यांचा निषेध

## निवेदनाद्वारे कारवाईची मागणी

# विकृत मनोवृत्तीच्या लोकांवर कठोर कारवाई करा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी/निफाड : भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते केंद्रीय विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांच्या विरोधात सवंग प्रसिद्धी मिळविण्यासाठी वाचाळवीर आमदार संजय गायकवाड व अनिल बोंडे यांनी अतिशय आक्षेपार्ह अशा स्वरूपाचे विधान केले आहे लोकप्रतिनिधी लोकप्रतिनिधींनी अस संसदीय असंविधानिक शब्दांचा वापर करणे हा लोकशाहीवादी झाला आहे स्वतःला प्रसिद्ध मिळवण्यासाठी राष्ट्रीय स्तरावरील नेत्यांना लक्ष करणे हा या आमदारांचा कायमचा प्रकार असून अशा विकृत मनोवृत्तीच्या लोकांवर कठोर कारवाई होऊन त्यांना शिक्षा झाली पाहिजे यासाठी निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदार विशाल नाईकवाडे यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली.

राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते केंद्रीय विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या विरोधात बुलढाण्याचे आमदार संजय गायकवाड व अनिल बोंडे यांनी जे बेताल वक्तव्य केले असून जीभ कापून आना आकरा लाख रुपये देतो.असे म्हणणे फार मोठा गुन्हा असून अशा प्रकारची दहशत निर्माण करण्याचे काम गायकवाड व बोंडे यांनी केले आहे या विकृतीचा आम्ही निफाड तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने निषेध करत असून अशा बेताल वक्तव्य करणाऱ्यांना तात्काळ अटक झाली पाहिजे, त्यांच्यावर गुन्हे दाखल झाले पाहिजे अशी मागणी आम्ही करतो.

**– मधुकर शेलार**
**(कॉग्रस माजी तालुकाध्यक्ष)**



याप्रसंगी राष्ट्रीय काँग्रेसच्या वतीने तहसीलदार कार्यालयात आंदोलन करत निवेदन देण्यात आले यावेळी निफाड तालुका काँग्रेस अध्यक्ष विजय जाधव, उपाध्यक्ष दीपक बोरस्ते , माजी ता.अध्यक्ष मधुकर शेलार ,कॉग्रस सेवा दल राज्य सचिव प्रकाश अडसरे ,वैकुंठ चोपडे , ता. सरचिटणीस सुहास सुरळीकर , महीला ता. अध्यक्ष रोहिणी शेळके, ता.चिटणीस.जयश्री कर्डक,शामराव शिंदे, माधवराव निचित, संजय जाधव, दिग्विजय अडसरे ,राजेंद्र बोरस्ते, सागर मोगल ,मधुसूदन आव्हाड, रामकृष्ण ताजणे ,आदि काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# सिम्बॉल ऑफ नॉलेज सा. संस्था निफाडच्या वतीने जि. प. प्राथ. शाळा सोनेवाडी खुर्द येथे शालेय साहित्याचे वाटप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड, (प्रतिनिधी) : निफाड तालुक्यातील सोनेवाडी खुर्द येथे सिम्बॉल ऑफ नॉलेज सामाजिक संस्थेच्या वतीने व संस्थेचे अध्यक्ष राकेश निकाळे यांच्या वाढदिवसानिमित्त विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद मराठी शाळा सोनेवाडी येथे इ. पहिली ते चौथीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना वही पेन व अंक लिपी व वाटप करण्यात आली असून सर्व जिल्हा परिषद शाळा, वृद्धाश्रम, अंध विद्यालय, आदी विद्यार्थ्यांना मदत करण्यात येईल, संस्थेचे समाजसेवेचे कार्य अशाच प्रकारे चालू राहील असे संस्थेचे अध्यक्ष राकेश निकाळे यांनी यावेळी आपले मत व्यक्त केले.



यावेळी शाळेचे मुख्याध्यापक वामन जाधव , शिक्षक नितीश पवार, शिक्षिका ज्योती सानप यांचे सहकार्य लाभले, तसेच शाळा व्यवस्थापक समितीचे अध्यक्ष गणेश मोरे, सरपंच अशोकराव आव्हाड, उपसरपंच छायाताई सोमनाथ सानप, प्रकाश भाऊ बांगर, पप्पू माळी, श्रीकांत माळी ,अमोल पवार व ग्रामस्थ उपस्थित होते

यावेळी संस्थेचे संचालक व पदाधिकारी, उपाध्यक्ष दादाराव काऊतकर , सचिव प्रेम वाघ, कोषाध्यक्ष विनोद गायकवाड, सहसचिव प्रवीण कोळी, सदस्य सुनील साळवे, योगेश गायकवाड, दादाराव पंडित, विक्रम आढाव, सचिन खडताळे उपस्थित होते.

दैनिक
# यश सिद्धि न्यूज



## थोडक्यात



### गर्ल्स हायस्कूल सैनिक टाकळीच्या मुलींची जिल्हा स्तरावरील हॉलीबॉल स्पर्धेत प्रथम क्रमांक

संजय चव्हाण/सैनिक टाकळी : शिरोळ येथील गर्ल्स हायस्कूल च्या मुलींनी बाचणी येथे झालेल्या जिल्हास्तरीय शालेय हॉलीबॉल स्पर्धेत १४ वर्षांखालील गर्ल्स हायस्कूल सैनिक टाकळीच्या मुलींनी प्रथम क्रमांक मिळवुन विभागात निवड झाली आहे. सेमीफायनल मध्ये देवाळे हायस्कूल ता, पन्हाळा बरोबर २५-६ व २५-८ सरळ दोन सेटमध्ये विजय मिळवून फायनल मधे गडहिंग्लज तालुक्यातील टीम बरोबर २५-१५ व २५-१८ अशा सरळ तीन पैकी दोन सेटमध्ये पराभव करून प्रथम क्रमांक मिळवुन पुढील विभागाच्या स्पर्धेत गर्ल्स हायस्कूल सैनिक टाकळी या टिमची निवड झाली आहे. क्रिडा शिक्षक वासमकर सर,व प्रतिक काटकर सर, मुख्याध्यापिका अंबुपे मॅडम, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व संस्था पदाधिकारी यांचे मार्गदर्शन लाभले.

### विवाहितेचा छळ ; पतीसह पाच जणांवर गुन्हा

सोलापूर : विवाहिता ही सासरी नांदत असताना घरातील लहान कारणावरून शिवीगाळ करून माहेरी हाकलून देऊन दुसरे लग्न करण्याची धमकी दिली.तसेच माहेरून १५ लाख रुपये आणण्यासाठी शारीरिक व मानसिक त्रास देत छळ केल्याची घटना दि.२२ नोव्हेंबर २०२० ते दि.८ मे २०२४ दरम्यान फिर्यादी यांच्या सासरी तरडगाव,ता.इंदापूर जिल्हा पुणे येथे घडली. याप्रकरणी आरती तेजपाल सोनवणे (वय-२४,रा.मड्डी वस्ती) जुना तुळजापूर नाका यांनी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती अक्षय सोनवणे,सासू रमा सोनवणे,दीर संग्राम सोनवणे,चुलत दीर राजू सोनवणे,चुलत नंणद शितल सोनवणे (सर्व.रा.तरडगाव,तालुका इंदापूर जिल्हा पुणे) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.तपास पोलीस हवालदार रुपनर हे करीत आहेत.

# सोमवारी अक्कलकोट ते सोलापूर या राज्यमहामार्गावर धनगर समाजाचा एस. टी. आरक्षणासाठी रास्ता रोको आंदोलन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

प्रतिनिधी /अक्कलकोट : महाराष्ट्र राज्यातील धनगर समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करण्यासाठी येत्या सोमवारी दिनांक २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११.०० वा. अक्कलकोट येथे अक्कलकोट ते सोलापूर या राज्यमहामार्गावर एम. एस. ई. बी. चौकात रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार असल्याचे निवेदन अक्कलकोटचे तहसीलदार विनायक मगर यांना देण्यात आले.

यावेळी सुनिल बंडगर, दत्तात्रय माडकर, सुभाष पुजारी, स्वामीराव घोडके, अप्पू चेंडके, सुर्यकांत बाचके, भुताळी वागदरी, विष्णू ठेंगले, हणमंत बिराजदार, कृष्णप्पा बिराजदार, संतोष फुलारे आदी उपस्थित होते.

तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की दिनांक ९ सप्टेंबर पासून पंढरपूर येथे पाच धनगर समाज बांधव आमरण उपोषणास बसले आहेत. पण सरकार यावर कोणत्याही प्रकारची कार्यवाही करताना दिसून येत नाही. धनगर समाजाचा एस. टी. प्रवर्गात समावेश करु नये यासाठी २५ आमदार ४ खासदार मिळून सरकारकडे मागणी केली आहे.

अदिवासी समाजाच्या आरक्षणाला कोणत्याही प्रकारचे धक्का न लावता धनगर समाजाला एस. टी. आरक्षणाची अंमलबजावणी करावी ही सकल धनगर समाजाची मागणी आहे.

तरी सकल धनगर समाजाच्या वतीने सोमवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी संपुर्ण महाराष्ट्रात एकदिवसीय रस्ता रोको आंदोलन करण्याचा इशारा दिला आहे. त्या अनुषंगाने अक्कलकोट शहर व तालुका सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने अक्कलकोट ते सोलापूर या राज्यमहामार्गावर एम. एस. ई. बी. चौकात आंदोलन करण्यात येणार आहे. तरी अक्कलकोट तालुका व शहरातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित रहावे सकल धनगर समाज बांधव अक्कलकोट तालुक्याच्या वतीने करण्यात आले आहे.





# माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांची वागदरी गावाला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/(एस.के.गायकवाड) : तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून पाच वेळा विजय हस्तगत करुन महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री म्हणून तर धाराशिव (उस्मानाबाद) जिल्हा पालकमंत्री म्हणून प्रतिनिधित्व करणारे माजी मंत्री मधुकरराव चव्हाण यांनी वागदरी गावाला भेट देऊन आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुक संदर्भात ग्रामस्थांसी संवाद साधला असून पुन्हा एकदा आपण तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून महाविकस आघाडीच्या माध्यमातून राष्ट्रीय काँग्रेस पक्षाकडून निवडणूक लढविणार असल्याचे सांगितले.

**आगामी होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुक संदर्भात ग्रामस्थांसी साधला संवाद**

मधुकरराव चव्हाण हे राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे महाराष्ट्रातील जेष्ठ बुजुर्ग नेते आहेत.त्यानी आता पर्यंतच्या राजकीय कारकीर्द तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून पाच टर्म विजय हस्तगत करुन महाराष्ट्राच्या मंत्रिमंडळात कॅबिनेट मंत्री, मराठवाडा वैधानिक विकास महामंडळाचे अध्यक्ष, विधानसभा उपाध्यक्ष आणि धाराशिव जिल्ह्याचे पालकमंत्री आसा पदभार सांभाळलत तुळजापूर विधानसभा मतदारसंघात अनेक साठवण तलावा सह विविध विकासात्मक कामे केलेली आहेत.उजणी धरणाचे अतिरिक्त पाणी मराठवाड्याला विशेषता धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर आणि धाराशिवला मिळाले पाहिजे यासाठी त्यांनी सातत्याने पाठपुरावा करून मराठवाड्याच्या हक्काचे पाणी मिळवून देण्यासाठी प्रयत्न केला आहे. वागदरी येथील ग्रामस्थांसी संवाद साधताना त्यांनी आपल्या आतापर्यंत केलेल्या विकास कामांना उजाळा दिला असून होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकीत महाविकास आघाडीच्या माध्यमातून आपण निवडणूक लढविणार असून मतदार बंधू भगिनींने सहकार्य करावे असे विनंती वजा त्यांनी आवाहन केले. या प्रसंगी जि.प.सदस्य प्रकाश चव्हाण, दिलीप सोमवंशी , सह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर : वारकरी संप्रदाय श्री संत कैकाडी महाराज यांचे वंशज श्री. किशोर महाराज जाधव यांच्या वाढदिवसानिमित्त आवताडे शुगर अँड डिस्टिलरीजचे चेअरमन व नामवंत उद्योजक मा. संजयजी मालक आवताडे यांनी सदिच्छा भेट देऊन वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. त्याप्रसंगी श्री.विनोद राज लटके, श्री. प्रसाद भैया कळसे,श्री.संतोष नाना डोंगरे,युवा नेते राहुलजी गावडे श्री.शंकरजी सुरवसे, उपस्थित होते.

# जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेत परमशेट्टी प्रशालेचे यश

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



दुधानी /प्रतिनिधी : अक्कलकोट तालुक्यातील दुधनी येथील श्री एस जी परमशेट्टी हायस्कूल दुधनी जिल्हास्तरीय १७ वयोगट मुलींचा संघ जिल्ह्यात उपविजेता ठरला.

या स्पर्धेत श्रावणी अचलेर लक्ष्मी परमशेट्टी चंदना पंडित श्रेया बशेट्टी अंबिका जाधव कोमल जाधव पायल राठोड अंकिता येगदी अंकिता वडियार रुबिना पठाण यांनी उत्कृष्ट कामगिरी केले यात श्रावणी अचलेर व श्रेया बशेट्टी यांचे इंट्री चंदना पंडित च कव्हर लक्ष्मी परमशेट्टी कॅचिंग अंबिका जाधवचं अष्टपैलू खेळ कोमल जाधव कॅचिंग यांच्या सुरेख कामगिरीमुळे मोहोळ माढा बार्शी या संघाचा पराभव करत अंतिम सामन्यात उपविजेतेपदावरती समाधान मानावा लागला .

तीन खेळाडू जखमी असताना अंतिम सामन्यात सांगोला कडवी झुंज दिली गावातील नागरिकांनी विजयी संघाच जल्लोषात स्वागत केले .या सर्व यशवंत खेळाडूंना क्रीडाप्रमुख दत्तात्रय हिळळी व नागराज कलबुर्गी अविनाश भैरूणगी व सेवक महादेव हंगरगी यांनी उत्तम मार्गदर्शन केले म्हणून संस्थेचे अध्यक्ष परमपूज्य जयगुरुशांतलिंगाराध्य शिवाचार्य महास्वामीजी उपाध्यक्ष महांतेश देसाई संस्थेचे सदस्य माजी मंत्री सिद्धाराम म्हेत्रे सातलिंगप्पा परमशेट्टी राजशेखर गाडी व शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राखी खंडाळ उपाध्यक्ष प्रभावती हौदे मुख्याध्यापक रेवणसिद्ध आलीगावे पर्यवेक्षक लक्ष्मीपुत्र गद्दी यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

# वागदरी परमेश्वराच्या पालखी महोत्सवानिमित्त मोठ्या उत्साहात अंबिल घागरीचे मिरवणूक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

वागदरी/महादेव सोनकवडे : वागदरी परमेश्वराच्या पालखी महोत्सवानिमित्त मोठे उत्साहाने अंबिल घागरीचे मिरवणूक पार पडले. शेकडो महिलांनी अंबिल घागरी घेवून लक्ष वेधून घेतले.

परमेश्वर पर्व-पालखी महोत्सवात प्रवचन सांगताना नागणसूर तुप्पिन विरक्त मठाचे डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजी. वागदरी विरक्त मठाचे श्री.शिवलिंगे श्वर महास्वामी, सिंदगीच्या सप्तस्वर संगीत कला मंचाचे संगीत कार्यक्रम झाला. समिती चे सदस्य आहेत.

वागदरीचे परमेश्वर पर्व-पालखी महोत्सव लक्ष वेधून घेतले अंबिल घागरीचे मिरवणूक डॉ. श्री अभिनव बसवलिंग यांचे प्रवचन , सप्तस्वर कला मंचाचे संगीत कार्यक्रम वागदरी परमेश्वर महाराजकी जय, 'हरहरा महादेव', 'रक्ष रक्ष परमेश्वर' या जयघोषात अक्कलकोट तालुक्यातील वागदरीचे ग्रामदैवत परमेश्वर पर्वा- पालखी निमित्त अंबिल घागरीचे मिरवणूक मोठे उत्साहाने पार पडले.




गुरुवारी दुपारी १२ वाजता गावातील महिलांनी हनुमान मंदिर ते परमेश्वर मंदिरापर्यंत काढलेल्या अंबिल घागरीचे मिरवणूक लक्ष वेधून घेतले. मिरवणुकीच्या मध्यभागी नागणसूर तुप्पीन मठाचे डॉ.अभिनव बसवलिंग महास्वामी आणि वागदरी विरक्त मठाचे शिवलिंगेश्वर महास्वामीजी यांचे बग्गीतून मिरवणूक निघाले. नंतर मंदिर परिसरात झालेल्या प्रवचन कार्यक्रमात डॉ. अभिनव बसवलिंग महास्वामीजी यांनी ऋऋपरोपकाराय पुण्य' या विषयावर आपले विचार व्यक्त करताना, परोपकारानेच मानवी जीवन सुखी होऊ शकते. परमेश्वरंच्या पर्व हा शेतकऱ्यांनी केलेला संभ्रमोत्सव आहे.शेतकरी सुखी असेल तरच देशाचा विकास होईल. उत्तर नक्षत्राचे पाऊस शेतकऱ्याला सुखी बनवतो. ऋउत्तरी बंदर बित्तरी' आणि ऋऋउत्तर बरदिद्दर सत्री'' अशा कन्नड मधील उक्ती प्रसिद्ध आहे.

पहाटे गावातील सुहासिनी अंबिल घागरी सजवून डोक्यावर घेऊन गावाच्या हनुमान मंदिरात जमल्या. तेथून मिरवणूक गावातील प्रमुख रस्त्यांवरून निघाली, तेथे बग्गीमध्ये दोनही महाराज होते. या मिरवणुकीत पाचशेहून अधिक महिला सहभागी झाल्या होत्या. मिरवणूक मंदिरात पोहोचल्यावर महास्वमिजींच्या हस्ते अन्नप्रसादाची सुरुवात झाली, त्यानंतर प्रवचनाचा कार्यक्रम झाला. प्राथमिक शिक्षक म्हणून निवृत्त झालेल्या वागदरी चे संगमेश्वर कलशेट्टी आणि सुलेमाना मुल्ला यांचा परमेश्वर आराधना पंच कमिटीच्या वतीने सत्कार करण्यात आला.

सिंदगीचे सप्तस्वर संगीत कला मंचाचे यशवंत बडिगेर, वीरभद्रैय्या कट्टीसांगावी, राजशेखर कट्टीसांगावी , सुरेश आलंद यांचा संगीत कार्यक्रम झाला.त्यांनी वचने, लोकगीते, भावगीते आणि भक्तिगीते गाऊन श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.रात्री शिव भजन, भारुड भजन , कालीगीतुरा , पारिजात भजन, आदी कार्यक्रम झाले. भक्तांनी खीर, खिचडी-अंबिल महाप्रसाद घेतले. पंच कमिटीच्या सदस्यांनी पाच दिवसांचे उपोषण सोडून मंदिरामध्ये गावातील सर्व कुटुंबीयांनी मिळून प्रसाद घेतले हे विशेष. उत्सवाच्या दुसऱ्या दिवशी शुक्रवारी सोलापूर किरीटेश्वर संस्थान मठाचे स्वामीनाथ महास्वामी व सोलापूर पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते पालखी पूजन झाल्यानंतर पालखीची मिरवणूक निघणार आहे. मिरवणूक मध्ये अनेक कला पथके सहभागी होतील.

अक्कलकोटाचे माजी आमदार सिद्धराम म्हेत्रे, माजी नगरसेवक मिलन कल्याणशेट्टी, गटशिक्षणाधिकारी प्रशांत अरबाळे, आनंद तानवडे, वकील माणीक राठोड, धर्मराज प्रचंडे, तालुका शिक्षक संघटनेचे अध्यक्ष बसवराज खिलारी आदी सहित हजारो भाविक भाग घेवून प्रसाद घेतले.



परमेश्वर आराधना पर्व समितीचे नूतन अध्यक्ष राजकुमार निंबाळे, गुड्डाप्पा भरमदे, अमृत निंबाळे, घाळय्या स्वामी, शरणप्पा मंगाणे, शिवानंद गोगाव, चंदु कणसे, श्रीशैल ठोंबरे, अशोक पोमाजी, विजय निंबाळे, शांतेश्वर कोटे, परमेश्वर पोमाजी, जगदीश निंबाळे, मल्लिनाथ ठोंबरे, सिद्धराम कोटे, सिद्धाराम बांगरगी, महादेव भरमदे आदींनी पर्व यशस्वीतेसाठी परिश्रम घेतले.

**कल्याणशेट्टी महाविद्यालयात सामाजिक शास्त्र मंडळाचा शुभारंभ कार्यक्रम**

**डॉ. श्रीकांत येळेगावकर यांचे प्रतिपादन**

# विद्यार्थ्यांनी स्वत:ला घडविण्यासाठी ध्येय निश्चित करावे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट : विद्यार्थ्यांनी स्वतःला घडविण्यासाठी मोठी स्वप्ने पहिली पाहिजेत, त्यासाठी अंगभूत कौशल्य विकसित करण्याची गरज आहे. त्यामुळे जीवनाची वाटचाल सुखकर होऊ शकते, त्यासाठी सामाजिक शास्त्राचे अध्ययन देखील महत्त्वपूर्ण आहे असे प्रतिपादन डॉ श्रीकांत येळेगावकर यांनी व्यक्त केले.

महर्षी विवेकानंद समाजकल्याण संस्था संचलित मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालयातील सामाजिक शास्त्र विषयांतर्गत इतिहास, राज्यशास्त्र व अर्थशास्त्र मंडळाच्या वर्षभरातील कार्यक्रमाचा शुभारंभ करताना 'चला घडवूया स्वतःला' या विषयावर मार्गदर्शन करताना ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते तर व्यासपीठावर इतिहास संशोधिका डॉ नभा काकडे, फॅमिली प्लॅनिंग ऑफ इंडिया सोलापूर शाखेचे अध्यक्ष डॉ नागनाथ तेली, प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी उपस्थित होते.

**विद्यार्थ्यांनी इतिहासाची वस्तुनिष्ठ मांडणी करावी, सामाजिक शास्त्र विषय अंतर्गत इतिहास हा विषय महत्त्वपूर्ण असल्यामुळे विद्यार्थ्यांनी इतिहासातील घटनेची मांडणी वस्तुनिष्ठ केली पाहिजे, असे आपल्या भाषणात इतिहास संशोधिका डॉ नभा काकडे यांनी सांगितले.**




पुढे बोलताना ते म्हणाले की, सामाजिक शास्त्र विषयामुळे विद्यार्थी घडतो, स्पर्धा परीक्षा देण्यास प्रवृत्त होतो, देश सेवा करण्याचे उद्दिष्ट ठेवतो म्हणून राज्यशास्त्र, इतिहास आणि अर्थशास्त्र हे विषय महत्त्वाचे असून त्या विषयाचे अध्ययन करावे. मल्लिनाथ कल्याणशेट्टी म्हणाले की, विद्यार्थ्यांनी स्वतःला घडवत असताना अभ्यासाचे नियोजन केले पाहिजे, ध्येय साध्य करण्यासाठी अविरत प्रयत्न केले पाहिजे, त्यामुळे यश निश्चित प्राप्त होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्य डॉ राजेंद्रसिंह लोखंडे यांनी केले, सूत्रसंचलन प्रा डॉ शितल झिंगाडे यांनी केले तर आभार प्रा डॉ बाळासाहेब पाटील यांनी मानले.

# खोटा मेसेज दाखवून फसवणूक करत जीवे मारण्याची धमकी ; दोघांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) खोटा मेसेज दाखवून अकरा लाख तीस हजारांची फसवणूक करून मारहाण करत जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध फौजदार चावडी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोपट दत्तात्रय इंगळे व किशोर राजे गाडे (रा.जाधव वस्ती, वाफेगाव,ता.माळशिरस जि.सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत.याप्रकरणी आकाश तुकाराम सारोळकर (वय-३१,रा. संतोष नगर,बाळे) यांनी फौजदार चावडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.ही घटना ११ ते १५ एप्रिल दरम्यान संतोष नगर बाळे येथे घडली.

या घटनेची हकीकत अशी की,वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादी यांच्या मालकीचे टाटा मोटर्स कंपनीची एलपीके टिप्पर हा फिर्यादी कडून खरेदी करून फिर्यादी यांचा विश्वास संपादन केला व त्यानंतर फिर्यादी यांना व्यवहाराच्या रक्कमेपैकी दहा लाख तीस हजार रुपये एचडीएफसी बँकेत आरटीजीएस केलेला खोटा मेसेज दाखवून एकूण ११ लाख ३० हजार रुपयांची आर्थिक फसवणूक केली.तसेच त्या रकमेची फिर्यादी यांनी मागणी केली असता,फिर्यादी यांना उचलून नेऊन मारहाण करून हातपाय तोडण्याची व गावाकडे आला तर जीवे ठार मारून टाकू अशीही धमकी दिली.असे फिर्यादीत नमूद आहे.पुढील तपास पोलीस हवालदार चुंगे हे करीत आहेत.